# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/07/2023 (शनिवार) दुपार

---

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. बेला :– अंतर्गत ३२ कि. मी अंतरावरील मौजा चिखलापार येथे दिनांक २८/०७/२०२३ चे सकाळी १०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– रोहीत रणधीर शंभरकर, वय १९ वर्ष, रा. चिखलापार ता. भिवापूर जि. नागपूर याचा काका नामे– सुनिल हा त्याचे घरासमोरून रोडने जात असतांना त्याचे घरासमोरील सिमेंट रोडवर उभे असलेले **आरोपी नामे– १) प्रज्वल नरेश मोरे, वय १९ वर्ष, रा. चिखलापार ता. भिवापूर जि. नागपूर २) आनंद नामदेव पाटील वय २६ वर्ष रा. चिखलापार ता. भिवापूर जि. नागपूर ३) विधीसंघर्ष बालक** फिर्यादीचे काका सुनिल त्यांचे जवळुन जात असतांना प्रज्वल मोरे हा त्याचे काकाला म्हणाला की फिर्यादीचे व आनंद पाटील यांचे तुझ्या पत्नीसोबत अनैतीक संबंध आहे अशी खोटी बदनामी का करत आहेस असे म्हणुन फिर्यादीचे काकासोबत वादविवाद करून बाजुला असलेल्या लागडाच्या ढिगाऱ्यातून आनंद पाटील, प्रज्वल मोरे, विधीसंघर्ष बालक यांनी हातात लाकडी काडया घेवून त्याचे काका सुनिल यांना छाती, डोक्यावर व हाता पायावर मारहाण करत असतांना त्याची आजी शोभाबाई झगडा भांडण सोडविण्यासाठी गेली असता प्रज्वल मोरे यांनी त्याच्या हातातील लाकडी काठीने फिर्यादीच्या आजीचे हातावर व कमरेवर मारहाण करून फिर्यादीचे काकाला जबर जखमी करून जिवे ठार मारले व त्याची आजी शोभाबाई ही झगडा सोडविण्याकरीता गेली असता तिला सुध्दा हातावर व कमरेवर मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीतांविरुध्द कलम ३०२, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. १) व २) यांना अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास मा. पुजा गायकवाड मा. उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग नागपूर या करीत आहे.

## चोरी

१) पो.स्टे. एम. आय. डी. सी. बोरी :– अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील भारकस येथे दिनांक २६/०७/२०२३ ते दिनांक २७/०७/२०२३ चे १४/०० वा. ते ०८/०० वा. पर्यंत फिर्यादी नामे– आशितोष तापोश कुमार घोष वय ३७ वर्ष, रा. लहरी कृपा सोसायटी खामला नागपूर हा टीकेजी इंडस्ट्रीज प्रायवेट लि. बुट्टीबोरी एम. आय. डी. सी. ज्यात ट्रीन्समिशन कंपनीचे प्लॉट तयार केले जाते या कंपनीत काम करतो. यातील ट्रीन्समिशन प्लेट स्वत: कंपनीचे खुल्या जागेत ठेवल्या होत्या दुसऱ्या दिवशी मॅनेजर रंजित रॉय यांनी फोन व्दारे माहीती दिली की, कंपनीत ठेवलेल्या प्लेटा दिसत नाही आहे. अंदाजे ७० प्लेटा किंमती अंदाजे १,३०,०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरी करून घेवुन गेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एम. आय. डी. सी. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक राजेंद्र तायडे मो. नं. ७३५०५३२२५१ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील मौजा कोळंबी शिवार येथे दिनांक २३/०७/२०२३ ते दिनांक २८/०७/२०२३ चे ११.०० वा. पुर्वी फिर्यादी नामे— मंगेश विलासराव शेगावकर, वय ४४ वर्ष, रा. एम. एस. सि. बी. ऑफीस काटोल ता. काटोल हे एम. एस. सि. बी. ऑफीस काटोल येथे कनिष्ठ अभियंता म्हणुन कार्यरत असुन यातील फिर्यादी हे ऑफीसमध्ये हजर असता फोनद्वारे केबल चोरी व पाईप चोरी बाबत फोनवर लाईनमॅन वाघे यांनी माहीती दीले वरून घटनास्थळी गेले असता कोळंबी शिवारात पेट्रोलपंप लागुन असलेल्या हायवे रोड क्रॉसिंगचे जवळील ईलेक्ट्रीक लाईटचे लोखंडी पोलवर गेलेला भुमीगत केबल ६ मिटर (३०० स्कुयर मीटर ११ किवी) उच्च दाब वाहीणीचे केबल तसेच ६ इंच जि. आय. पाईप अंदाजे एकुण किंमती अंदाजे १८४००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक विकास वाईलकर ब. नं. ४७२ मो. नं. ९५११२२०१३० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**